**मजकुर :—**

दिनांक २२/०३/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे जानेवारी —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जानेवारी —२०२४

| | | |
|---|---|---|
| **०१** | **गु.प्र.शा.गु.अ.वि. कक्ष—५, मुंबई** | **कुर्ला पोलीस ठाणे अपमृत्यू नोंद क्रमांक ०२/२४ कलम १७४ फौ.दं.प्र.सं.,कुर्ला पो.ठाणे गु.र.क्र. १८/२०२४, कलम ३०२, २०१ भादवि सह कलम ३, ४, २५ भाहका, सह कलम ३७(१) (अ), १३५ मपोका** |

**—: “ अनैतिक संबंधाच्या संशयावरून खुन ”:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयात दिनांक ०४/०१/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दिनांक ०५/०१/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. चे दरम्यान १) नफीस शराफत खान,उर्फ कक्की, वय ३६ वर्ष, २) मुकेश श्यामनारायण पाल, वय २५ वर्ष ३) मोहम्मद साकीर सेद उर्फ जस्तीन वय २३ वर्ष, यांनी इसम आमान शेख याने नफीस खान उर्फ कक्की याचे पत्नीसोबत संबंध ठेवल्याचे व तीस पळुन जाण्यास सहाय्य केल्याचे संशयावरून, तसेच आर्थीक कारणांवरून फौजदारीपात्र कट रचला व अमान शेख, यास नफीस खान उर्फ कक्की याचे राहते घरी बोलावुन त्याचा गळा आवळुन खुन केला व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने अमानचा मृतदेह एम.टी.एन.एल. जंक्शन जवळील, मिठी नदी, कुर्ला पश्चिम, मुंबई याठिकाणी खाडीचे पात्रात फेकुन दिला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती सुनिता अभिजीत भोर वय ४२ वर्षे, |
| बळीत | :— | अमान अब्दुल करीम शेख, वय २३ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) नफीस शराफत खान,उर्फ कक्की वय ३६ वर्षे,<br>२) मुकेश यामनारायण पाल, वय २५ वर्षे,<br>३) मोहम्मद साकीर सेद उर्फ जस्टीन वय २३ वर्षे,<br>अटक दिनांक — १२/०१/२०२४ |

**तपास कौशल्य :—** नमूद गुन्हयांत दिनांक ०५/०१/२०२४ रोजी कुर्ला पोलीस ठाण्याचे हद्दीत मिठी नदीचे पात्राचे कडेस एमटीएनएल जंक्शनजवळील ब्रिजचे खाली, कुर्ला पश्चिम या ठिकाणी एक अनोळखी बेवारस मयताचे प्रेत सापडले असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. लागलीच कक्ष ५ कडील पोलीस निरीक्षक येरेकर, पोलीस निरीक्षक सुनिता भोर व पोलीस पथक हे मयताचे प्रेत भेटलेल्या घटनास्थळी पाहणी करण्याकरीता रवाना झाले. सदर पोलीस पथकाने घटनास्थळी पाहणी केली व प्रेताचे तसेच घटनास्थळाचे अवलोकन केले असता प्रेत पडलेल्या ठिकाणी कोणीही मनुष्य जाणे अशक्य होते तसेच सदर मयताचे प्रेत हे मिठी नदीचे पात्रालगत असले तरी ते पाण्यातुन वाहुन आलेले दिसत नसल्याने कोणीतरी सदरचे प्रेत हे तेथे आणुन टाकले असल्याचे दिसत होते. तसेच मयताचे अंगावर, तोंडावर तसेच गळयास जखमा होत्या. सदर जखमांचे स्वरूप पाहता मयतास कोणीतरी इतर ठिकाणी मारून सदर ठिकाणी आणुन टाकले असल्याबाबत दाट संशय निर्माण झाला.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखुन लागलीच सदर प्रकरणाची मा. वरिष्ठांना माहीती देवून त्यांचे मार्गदर्शनाखाली तपास चालु करण्यात आला. दरम्यान सदर अनोळखी मयताचे प्रेताबाबत कुर्ला पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यु नोंद क्रमांक ०२/२०२४ अन्वये सीआरपीसी १७४ प्रमाणे दिनांक ०५/०१/२०२४ नोंद करण्यात आली.

सदर अकस्मात मृत्युसंदर्भात तपास करताना यातील मयताची ओळख पटविणे ही प्राथमीकता असल्याचे दिसून आल्याने लागलीच मयताचा फोटो काढुन मयताचे प्रेताची छोटीशी माहीती नमुद करणारा एक मेसेज तयार करून सदरचा मेसेज हा सोशल मिडीयावर प्रसिद्ध करण्यात आला व सदर इसमास कोणी ओळखत असल्यास संपर्क साधण्याकरीता कळविण्यात आले. तसेच स्थानीक बातमीदार यांना यातील मयताचा फोटो देवून अश्या वर्णनाचा कोणी इसम बेपत्ता आहे काय ? याची माहीती काढण्याकरीता सांगण्यात आले.

यातील मयत हा कोठेतरी मिसींग असण्याची शक्यता असल्याने लागलीच मुंबई शहर पोलीस आयुक्तालयात नोंद असलेल्या मोठे मनुष्य मिसींग रजीष्टर चेक करण्यात आले. तसेच मुंबई पोलीस आयुक्तालय व्यतीरीक्त नजीकच्या ठाणे शहर, नवी मुंबई व मिरा भाईंदर पोलीस

आयुक्तालयाचे अभिलेख देखील पडताळण्यात आले.

अश्या प्रकारे चेक करीत असताना शिवाजीनगर पो.ठा. मोठे मनुष्य मिसींग रजी नंबर ०६/२०२४ प्रमाणे दि.०६/०१/२०२४ रोजीच्या दाखल मिसींग मधील इसम अमान अब्दुल करीम शेख, वय २३ वर्षे, हा दि.०४/०१/२०२४ रोजी सायंकाळी १६.०० वा. चे सुमारास घरातुन निघुन गेला तो परत आला नसल्याबाबत नोंद नमुद होती. तसेच कुर्ला पो.ठा. अकस्मात मृत्युचे चेहऱ्याशी मिळता दिसून आला.

तात्काळ मिसींग व्यक्तीचे नातेवाईक त्याचा मेव्हणा साहीबे आलम व मयताची बहीण यांचेशी चर्चा केली असता दिनांक ०४/०१/२०२४ रोजी अमान हा सायंकाळचे सुमारास रिक्षा चालविण्याकरीता गेला तो परत आला नाही. तसेच अमान हा कक्की नावाचे इसमाची रिक्षा चालवत असल्याची माहीती दिली. अमान हा दिनांक ०४/०१/२०२४ रोजी चालवत असलेली रिक्षा क्रमांक एमएच ०३ सीटी ८४६० ही दिनांक ०५/०१/२०२४ रोजी दुपारी पी एल लोखंडे मार्ग, फ्रि वे ब्रिजचे खाली असलेल्या पार्कीगमध्ये उभी होती असे नातेवाईकांनी सांगीतले.

यातील मयत याचे ताब्यात असणारी सदरची रिक्षा ही सदर पार्कीगमध्ये व्यवस्थीत पार्क कशी झाली याचा शोध घेण्याकरीता लागलीच सदर ठिकाणी तपासी पथकाने भेट दिली व पार्कीगचे मालक समीर बुरोडकर, यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी दि. ०५/०१/२०२४ रोजी पहाटे सदर ठिकाणी रिक्षा पार्क झाली असल्याचे सांगीतल्याने सदर पार्कीगमध्ये रात्रौपाळीस कर्तव्यावर असणारे आकाश व गुड्डु यांना बोलावुन त्यांचेकडेस तपास केला असता त्यांनी दि. ०५/०१/२०२४ रोजी पहाटे ०३.३० वा. चे सुमारास सदरची रिक्षा पार्क झाली असल्याचे सांगीतले. त्यांना सदरची रिक्षा कोणी पार्क केली याबाबत विचारले असता त्यांना सांगता येत नसल्याने त्यांना यातील मयत अमानचा फोटो दाखविला असता त्याने सदरचा इसम हा रिक्षा पार्क करण्याकरीता आला होता असे सांगीतले. परंतु अमान याचेसोबत आणखी तीन इसम होते व चौघेजण एकत्र आले होते. अमान याने रिक्षा पार्क केल्यानंतर चौघेजण त्यांनी सोबत आणलेल्या दुसऱ्या रिक्षाने सदर ठिकाणाहुन निघुन गेल्याचे त्यांनी सांगीतले.

सदर माहीती मिळाल्याने इतर तीन इसम कोण याचा शोध घेणे आवश्यक झालयाने पार्कीगचे ठिकाणी सीसीटीव्ही चेक केले असता ते बंद असल्याचे दिसून आले. त्यानंतर आजुबाजुचे परिसरातील पार्कीगचे दिशेने येणारे रोडवरील ३०/४० खाजगी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज चेक केले. अश्या प्रकारे परिसरातील सर्वच सीसीटीव्ही फुटेज चेक करीत असताना फ्री वे ब्रिजचे खाली असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये दि.०५/०१/२०२४ रोजी पहाटे ०३.२८ वा. चे सुमारास अमान हा रिक्षा पार्कीगमध्ये घेवून जात असल्याचे व तीन इसम त्याचे मागोमाग येत असल्याचे दिसून आले. सदर सीसीटीव्हीमध्ये चेहरे अस्पष्ट दिसत असल्याने मयताचे नातेवाईक व मित्र यांना फुटेज दाखवले असता त्यांनी अमान यास ओळखले तसेच अमान याचे मागोमाग येणारे सदरचे ३ इसम हे कक्की, शाकीर उर्फ जस्टीन व मुकेश पाल असे असल्याचे सांगीतले.

अश्या प्रकारे गुन्हयातील संशयीत निष्पन्न झाल्यानंतर तीनही संशयीत आरोपीतांचे मोबाईल नंबर प्राप्त करून त्यांचे विश्लेषण केले त्यात दि.०५/०१/२०२४ रोजी पहाटेचे सुमारास कुर्ला परिसरात येवून गेले असल्याचे दिसून आले. लागलीच त्यांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेण्याकरीता स्वतंत्र पोलीस पथके तयार करण्यात आली. मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाद्वारे पाहीजे आरोपी नफीस शराफत खान उर्फ कक्की, वय ३६ वर्षे, यास दि.१२/०१/२०२४ रोजी शिताफीने ताब्यात घेतले.

पोलीस निरीक्षक अजीत गोंधळी व पोलीस पथक यांनी आरोपीत मुकेश रामनारायण पाल, वय २५ वर्षे, याचा सदर परिसरात मोबाईल तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तसेच स्थानीक बातमीदारांचे मदतीने शोध घेवून त्यास ताब्यात घेतले व कक्ष कार्यालयात आणले. आरोपी मोहम्मद साकीर सेद उर्फ जस्टीन, वय २३, याचासुध्दा मोबाईल तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तसेच स्थानीक बातमीदारांचे मदतीने शोध घेवून त्यास ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या तीनही आरोपीतांकडे स्वतंत्ररित्या, कौशल्यपुर्वक व तंत्रशुद्ध पद्धतीने विचारपूस केली असता तीनही आरोपीतांनी यातील मयत अमान शेख याचा खुन केल्याचे कबुल केले.

अश्या प्रकारे बेवारस सापडलेल्या प्रेताचे आधारे सखोल व कसोशीने तपास करून कक्ष ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी अतीशय निर्घुणपणे केलेल्या खुनाचे असे संवेदनशील स्वरूपाचे दोन खुनाचे गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळविलेले आहे. त्यामुळे जनमानसात पोलीस दलाची प्रतीमा सुधारण्यामध्ये कक्ष ५ कार्यालयाच्या अधिकारी व अंमलदार यांनी मोलाची कामगिरी बजावलेली आहे.

## गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष–५, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | घनश्याम सत्यदास नायर, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक, | सदानंद किशनराव येरेकर, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक, | अजित महादेव गोंधळी | |
| ०४ | पोलीस निरीक्षक | सुनिता अभिजीत भोर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा.पोलीस निरीक्षक, | अमोल माधव माळी, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा.पोलीस उप निरीक्षक, | जयदीप मोहन जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | विजय वसंत बेंडाले | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | स.पो.उ.नि.क्र. २८२२७ | अंकुश बाबालाल न्यायनिर्गुणे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.पो.उ.नि.क्र. ११०३४ | अशोक पांडुरंग भुजबळ, | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.पो.उ.नि.क्र. २९७९९ | रविंद्र महिपत राणे, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ३१२४९ | विलास देविदास देसाई, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ३१३१८ | सुजीत भागवत घाडगे, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र. ३३४०९ | इक्बाल संतोष सिंग, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ३३८२७ | मिलींद दिनकर निरभवणे, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ९६०५३६ | नितेश नारायण विचारे, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | मपोहक्र. ९८०५४४ | सुनिता संजय शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र. ०१–५८ | अविनाश शंकर चिलप, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र. ०३२०४ | तानाजी शंकर पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०८०६८६ | सरफरोज सलिम मुलाणी, | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र.०९०२८४ | युवराज श्रीपती सावंत, | प्रशस्तीपत्रक |
| २१ | मपोशिक्र. ०९११३९ | शुभांगी ज्योतेष पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २२ | मपोशिक्र. ०९१४०१ | सुप्रीया सुभाष पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र. १४०३५४ | भाऊसो रावसो पवार, | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र. १५१११३ | प्रमोद धोंडीराम पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.ह.चा.क्र.९९०६०७ | हरेश लक्ष्मण कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.चा.छा.क्र. ३२२ | शुभम जनार्दन सावंत | प्रशस्तीपत्रक |

# २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर –२०२३

| | | |
|---|---|---|
| ०२ | पवई हिल पोलीस ठाणे, परिमंडळ – १०, मुंबई | गु.र.क्र. ९१/२०२४ कलम ३६४ (अ), ३४ भादवि |

**–: " बळजबरीने अपहरण करून पैशाची मागणी करणे ":–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :–** नमूद गुन्हयात तक्रारदार श्रीमती मेघा भुषण अरोरा, वय ४० वर्षे, यांचे पती भुषण अरोरा यांचे काही व्यक्तींशी अर्थिक व्यवहार होते व नमुद व्यवहारामध्ये देणे बाकी होते. त्यांना देणे शक्य होत नसल्या कारणाने समोरचे सर्व व्यक्तीं त्यांना आप आपल्या परीने धमकावत होते. त्यांचे पतीचे अचानक निघुन जाण्याने अगर मिसिंग होण्याच्या पाठीमागे त्यांना त्यांच्या पैकी कोणीतरी किंवा अन्य कोणीतरी अर्थिक व्यवहारातील वादातुन त्यांचे पतीला अटकावुन ठेवले असुन त्याच्या मोबदल्यात पैश्याची मागणी करत होते म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्रीमती मेघा भुषण अरोरा, वय ४० वर्षे, |
| बळीत | :– | भुषण अरोरा |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) अमोल परशुराम म्हात्रे, वय ४१ वर्षे<br>२) निरंजन इंद्रमोहन सिंग, वय ३२ वर्षे<br>३) विधीचंद्र गयाप्रसाद यादव, वय ३१ वर्षे<br>४) मो. सुलेमान उर्फ सलमान मो. मोनिब, वय २० वर्षे<br>अटक दि. २२/०१/२०२४ |

**तपास कौशल्य :–** नमूद गुन्हयाच्या फिर्यादी श्रीमती मेघा भुषण अरोरा, वय ४० वर्षे यांनी त्यांचे पती नामे भुषण अरोरा हे दिनांक १७/०१/२०२४ रोजी ऑफीसला जातो असे सांगून घरुन गेले ते दिनांक १८/०१/२०२४ रोजी दुपारपर्यंत घरी परत न आल्याने त्यांनी त्यांचे पतींची मिसींग तक्रार दिली होती. दिनांक १८/०१/२०२४ रोजी रात्रौ २०.३० वा सुमारास त्यांच्या पतीचा त्यांना फोन आला की, पाच कोटी रुपयांची व्यवस्था करुन ठेव. त्यानंतर दिनांक १९/०१/२०२४ रोजी अपहरणकर्त्याने फिर्यादी यांच्या पतीच्या फोन वरुनच फोन करुन पाच कोटीची व्यवस्था झाली का? अशा धमकीचा फोन केल्याने घटनेचे गांभीर्य ओळखून फिर्यादीचा सविस्तर जबाब नोंद केला. नमुद जबाबात फिर्यादीने त्यांचे पतीने स्टॉक मार्केट मध्ये स्वत:चे नातेवाईक, मित्र व इतर यांचे पैसे गुंतविले होते. परंतू स्टॉक मार्केट मध्ये तोटा झाल्याने सर्व गुंतवणुकदार हे त्यांचे पैसे वारंवार परत मागत आहेत व ते देणे शक्य होत नसल्याने ते त्यांना धमकावत होते.

दाखल गुन्हयाचे गांभिर्य ओळखून तात्काळ १२ तपास पथके तयार करुन अपहरणकर्त्यांचा शोध सुरु करण्यात आला होता. तांत्रीक व पारंपारीक तपासाच्या आधारे पनवेल, नवी मंबई, माथेरान परिसरात आरोपीतांचा शोध घेत असताना पनवेल तालुका परिसरातील फार्म हाऊसेंस पिंजून काढले. त्याच दरम्यान मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१० यांना मिळालेल्या खात्रिशीर माहितीच्या आधारे तपासी पथक यांनी कामोठे, नवी मुंबई ब्रिज येथे सापळा रचून नमूद गुन्हयातील १) अमोल परशुराम म्हात्रे, वय ४१ वर्षे, व २) निरंजन इंद्रमोहन सिंग, वय ३२ वर्षे, या दोन आरोपीत इसमांना इको गाडीसह दिनांक २२/०१/२०२४ रोजी ताब्यात घेतले व भुषण अरोरा यांची सुखरुप सुटका करुन त्यांचा जीव वाचविला.

गुन्हयातील अटक आरोपी अमोल परशुराम म्हात्रे व निरंजन इंद्रमोहन सिंग, यांच्या कडे नमुद गुन्हयाचा सखोल तपास करत असताना त्यांच्याकडुन आजुन दोन आरोपीची नमुद गुन्हयात सभागी असल्याचे त्याच्याकडुन तपासादरम्यान समोर आले. नमुद पाहिजे आरोपी विधीचंद्र गयाप्रसाद यादव व मो. सुलेमान उर्फ सलमान मो. मोनिब या दोन आरोपीचा शोध घेवुन त्याना दिनांक २२/०१/२०२४ रोजी गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आली.

सदर यशस्वी कामगिरी ही तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली आहे.

## पवई हिल पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | श्री जितेद्र सोनवणे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक, | गणेश पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा.पोलीस निरीक्षक | संतोष कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा.पोलीस निरीक्षक, | विनोद लाड | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक, | सुधीर पिलाणे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र ९६०६०७ | तानाजी टिळेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र. ४९२५ | बाबू येडगे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र ०३०८६० | आदित्य झेंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र ०६१८२१ | संदिप सुरवाडे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र.०९८४१ | सुर्यकांत शेट्टी | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र.११०८४६ | रविंद्र ठाकरे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ०६०६९० | विशाल पिसाळ, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोशि १११०९६ | प्रशांत धुरी, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पोशि०८०६७० | देवीदास पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पोशि ११०८१० | भास्कर भोये, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पोशि १४०४५५ | अर्जुन राठोड | प्रशस्तीपत्रक |
| १७ | म.पो.शि.०९११८४६ | शितल लाड | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २२/०३/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे जानेवारी —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी — २०२४

| | | |
|---|---|---|
| **०१** | **बोरीवली पोलीस ठाणे, परिमंडळ—११, मुंबई मुंबई** | **गु.र.क्र. १७४/१२ कलम ३६५, ३०२, २०१, ३४, ४२०, ४५७, ४६५, ४६८, ४७१, ३८०, ३६४, ३४२, ४०४, ३९२ भा.दं.वि.** |

—: '' **खोटी कागदपत्र बनवून फसवणूक करून जीवे मारणे** '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दि.२६.०४.२०१२ रोजी १३:३० ते दि. ३०.०४.२०१२ रोजी १८:०० वाजताचे सुमारास अज्ञात इसमाने अज्ञात कारणांसाठी गुन्हयातील बळीत नितीन रतिलाल धकान, वय ४८ वर्षे, यांच्या ताब्यातील मो/कार जबरीने काढून घेतली.

त्यानंतर त्याच्याकडील मोबाईल फोन, पर्स, पैसे, क्रडीट कार्ड घराची चावी या वस्तुंचा अप्रामाणिकपणे अपहार केला. तसेच मयत इसमाचे घराचे चावीचा वापर करुन रात्रीच्या वेळी मयताचे घराचे लॉक उघडून घरात प्रवेश करुन रोख रक्कम चोरी केली. तसेच क्रेडीट कार्डचा वापर करुन मयताच्या बनावट सह्या करुन सहा शर्टस खरेदी केले. तसेच मयत इसमाच्या मो/कारवर बनावट नंबर प्लेट लावून ती वापरुन फसवणूक केल्याचे गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री किशोरभाई रतिलाल धकान, वय ५२ वर्षे |
| बळीत | | नितीन रतिलाल धकान, वय ४८ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि. १७.०१.२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) गोपाळ साधुशरण पांडे, वय ४५ वर्षे,<br>२) अभिजीत अनंत भोसले, वय २४ वर्षे,<br>३) हारुन इब्राहिम शेख, वय ३५ वर्षे,<br>४) सचिन राजाराम चोरगे, वय २८ वर्षे,<br>५) ब्रिजेश शंभूनाथ मिश्रा, वय ३३ वर्षे,<br>६) बिरबल रामविलास सिंग, वय ३७ वर्षे,<br>अटक दि. १३/०६/२०१२ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | सदर गुन्ह्यात मा. न्यायालयाने आरोपीतांना दोषी ठरवून खालील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>१)कलम ३०२ भा.दं.वि. आजन्म सश्रम कारावास व रु.५०००/— दंड आणि दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास<br>२) कलम ३६४ भा.दं.वि.१० वर्षे सश्रम कारावास व रु.२०००/— दंड आणि दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास<br>३) कलम ३६५ भा.दं.वि. ५ वर्षे सश्रम कारावास व रु.१०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>४) कलम ३४२ भा.दं.वि. : १ वर्ष सश्रम कारावास व रु.५००/— दंड आणि दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास<br>५) कलम ३९२ भा.दं.वि. ७ वर्षे सश्रम कारावास व रु.१०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>६) कलम ४२० भा.दं.वि. ५ वर्षे सश्रम कारावास व रु.२०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>७) कलम ४०४ भा.दं.वि. २ वर्षे सश्रम कारावास व रु.३००/— दंड आणि दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास<br>८) कलम ४६५ भा.दं.वि. : १ वर्ष सश्रम कारावास व रु.३००/— दंड आणि दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास<br>९) कलम ४६८ भा.दं.वि. ५ वर्षे सश्रम कारावास व रु.१०००/— दंड |

| | | |
|---|---|---|
| | | आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>१०) कलम ३८० भा.दं.वि.५ वर्षे सश्रम कारावास व रु.१०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>११) कलम २०१ भा.दं.वि.५ वर्षे सश्रम कारावास व रु.२०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>११) कलम ४७२ भा.दं.वि.५ वर्षे सश्रम कारावास व रु.१०००/— दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास<br>१३) कलम ४१९ भा.दं.वि. २ वर्षे सश्रम कारावास व रु.५००/— दंड आणि दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास<br>१४) कलम ४१९ भा.दं.वि. २ वर्षे सश्रम कारावास व रु.५००/— दंड आणि दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास |

**तपास कौशल्य** :— गुन्ह्याच्या तपासादरम्यान दि. १३.०६.२०१२ रोजी गुन्हे प्रकटीकरण कक्ष, युनिट ११, कांदीवली, मुंबई यांनी गुन्हयातील आरोपी गँगस्टर — १) गोपाळ साधुशरण पांडे, वय ४५ वर्षे, २) अभिजीत अनंत भोसले, वय २४ वर्षे, ३) हारुन इब्राहिम शेख, वय ३५ वर्षे, ४) सचिन राजाराम चोरगे, वय २८ वर्षे, ५) ब्रिजेश शंभूनाथ मिश्रा, वय ३३ वर्षे आणि ६) बिरबल रामविलास सिंग, वय ३७ वर्षे यांना ताब्यात घेतले त्यांनतर सर्व आरोपींना बोरीवली पोलीस ठाणे येथे आणून अटक करण्यात आली.

गुन्हयातील अटक आरोपींनी संगनमताने यातील अपहृत इसम नितीन रतिलाल धकान याचे अपहरण करून त्यास जीवे ठार मारुन त्याचा मृतदेह तुंगारेश्वर येथील जंगलात जाळून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याचे तपासात निष्पन्न केले.

सदर गुन्हा दाखल झाल्यापासून ते सुनावणी पुर्ण होईपर्यंत गुन्ह्यचे तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक प्रविण मोरे (सेवानिवृत्त सहायक पोलीस आयुक्त) यांनी सदर गुन्ह्याचा कौशल्यपुर्ण तपास करुन गुन्ह्यातील सर्व अटक आरोपीतांना कठोर शिक्षा होईल याबाबत योग्य ती खबरदारी घेतली.

तसेच त्यांनी गुन्ह्यातील साक्षीदारांना निर्भिडपणे साक्ष देणेकामी विश्वासात घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यांना याकामी बोरीवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी आणि कारकून तसेच समन्स—वॉरंट बजावणी अंमलदार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) लेखनिक यांनी उत्तम सहकार्य केले आहे. अशा प्रकारे न्यायालयीन स्तरावर गुन्हा शाबित ठरण्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे देखरेख आणि मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी आणि कारकून तसेच समन्स—वॉरंट बजावणी अंमलदार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) लेखनिक अशा पथकाने कौशल्यपूर्ण कामगिरी बजावली आहे.

**बेरीवली पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ —११,तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक.<br>(सेवनिवृत सहा.पोलीस आयुक्त ) | प्रवीण मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | म.स.पो.उ.नि. | विद्या माने | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | स.पो.उ.नि. | विजय घनवट | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.०६१२८२ | अनंत चित्ते | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | म.पो.शि.०७१३६७ | रुपाली कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र.०१४५७ | विश्वनाथ कोंडविलकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.३२०६५ | हरिष राणे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र.०१४४ | प्रशांत सावर्डेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.३२६२५ | विलास सावंत | प्रशस्तीपत्रक |

**टिप:—** वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—०६, पवई पोलीस ठाणे आणि बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month January – 2024 व Best Conviction of the January – 2024 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म. रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न | |

| | | |
|---|---|---|
| | थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# <u>INTEGRITY CERTIFICATE</u>

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation- …………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2023